85

# तिफण

वर्ष : २१ वे । अंक २ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

| | | |
|---|---|---|
| 83. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अलौकिकत्व<br>- प्रा. डॉ. मोहन राजाराम कापगते | 308 - 312 |
| 84. | शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. निता मेश्राम (पाटील) | 313 - 316 |
| 85. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टीकोन<br>- पंढरीनाथ हरी मोकळे | 317 - 319 |
| 86. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण : एक अर्थशास्त्रीय अध्ययन<br>- प्रा.डॉ.अमोल गिरिधरराव आवंडकर | 320 - 324 |
| 87. | छत्रपती शिवाजी महाराजांची आरमार विषयक भूमिका<br>- प्रा.डॉ. नवनाथ येठेकर | 325 - 328 |
| 88. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टीकोन<br>- पूनम वाघ | 329 - 331 |
| 89. | शिवचरित्रात रामदास एक कपोलकल्पित कारस्थान<br>- प्रा.डॉ. सतिश रावसाहेब कदम | 332 - 334 |
| 90. | छत्रपती शिवाजी महाराजांचा आर्थिक दृष्टीकोन<br>- डॉ.जयश्री आसाराम तळेकर | 335 - 336 |
| 91. | शिवाजी महाराजां चा स्त्रीविषयक दृष्टीकोन<br>- गीता किसन इंगळे | 337 - 341 |
| 92. | छत्रपती शिवाजी महाराज : कर्तुत्व<br>- डॉ. दीपक गायकवाड | 342 - 344 |
| 93. | छत्रपती शिवाजी महाराजांचा आर्थिक दृष्टीकोन<br>- कानवडे अर्चना रामनाथ | 345 - 347 |
| 94. | छत्रपती शिवाजी महाराजां चे प्रशासन आणि व्यवस्थापन<br>- डॉ. विवेक वि. नागभिडकर | 348 - 351 |
| 95. | म. फुले लिखित छत्रपती शिवाजी राजांचा पोवाडा : आकलन आणि आस्वाद<br>- प्रा. डॉ. गोवर्धन मुळक | 352 - 357 |
| 96. | छत्रपती शिवाजी महाराजांची इतिहासप्रसिद्ध सुरतेची लुट : एक दृष्टीक्षेप<br>- तेजस शांताराम रेवाळे | 358 - 361 |
| 97. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनशास्त्र विषयक भूमिका<br>- अनिता आत्माराम पवार | 362 - 366 |
| 98. | छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे आरमार विषयक दृष्टीकोण<br>- डॉ. दराडे संभाजी सोपानराव व - प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर | 367 - 370 |
| 99. | महात्मा फुले लिखित छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे व - डॉ. ललिता मानसिंग गोपाळ | 371 - 377 |



# छत्रपती शिवाजी महाराज : कर्तृत्व

- डॉ. दीपक गायकवाड
यहायक प्राध्यापक
श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे
ई-मेल : drdeepakssmmm@gmail.com

भारत देशाला फार मोठा राजकीय इतिहास लाभला आहे. यामध्ये महाराष्ट्राचा राजकीय इतिहास हा इतर राज्यांपेक्षा वेगळा आहे. एकूणच पाठीमागचा दोन हजार वर्षांचा इतिहास पाहिला तर जागतिक पातळीवर ज्या राजाची दखल आवर्जून घेतली जाते ते छत्रपती शिवाजी महाराज होते. त्याचे कारण इतर राजा-महाराजांपेक्षा छत्रपतींचे कर्तृत्व वेगळे व असामान्य आहे. राजकीय शौर्य, दूरदृष्टी, सर्वधर्मसमभाव, सर्वसंत समभाव, सहिष्णुता, नम्रता, अहंकारविरहित जाती-धर्म-पंथभेदातीत दृष्टी व वागणूक, साधुतुल्य गुणसंचय, प्रखर बुद्धिमत्ता, प्रचंड आत्मविश्वास ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व कर्तृत्वाची काही वैशिष्ट्ये आहेत. असामान्य कार्य होण्यासाठी असामान्य व्यक्ती असावी लागते. राष्ट्राच्या उद्धारासाठी अशा व्यक्तित्वाची गरज असते. यासाठी सत्तेचा वापर सार्वजनिक व गोरगरिबांसाठी करावा लागतो. छत्रपतींनी लोकशाहीच्या आड राज्यसत्ता येऊ दिली नाही म्हणून त्यांच्या कर्तृत्वाला वेगवेगळे पैलू आहेत. युगनिर्मितीचे कार्य महाराजांनी आपल्या कार्यातून स्वकर्तृत्वातून केले, हे विसरून चालणार नाही.

**महाराजांचे कर्तृत्व -**

महाराजांनी मुस्लीम राजवटीला पायबंद घालून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. उत्तरेकडील हिंदुस्थान पादाक्रांत केल्यानंतर मुसलमानांनी आपले लक्ष दक्षिणेकडे वळवले व यादवांचे हिंदू साम्राज्य नष्ट केले. डॉ. जयसिंगराव पवार म्हणतात, "शिवाजी महाराजांची मुख्य कामगिरी म्हणजे महाराष्ट्रावरील मुसलमानी अंमल नष्ट करून येथे त्यांनी निर्माण केलेले हिंदूंचे स्वराज्य ही होय."[1] हे स्वराज्य निर्माण करताना महाराजांचे असामान्य कर्तृत्व दिसते; कारण ज्या बिकट परिस्थितीत महाराज कार्य करीत होते त्याची जाणीव त्यांना होती. आदिलशाही व मुघल या दोन मोठ्या शत्रूंचा पराभव करणे हे मराठी राज्याच्या व राजाच्या आवाक्याबाहेरचे काम होते; पण महाराजांनी हे आव्हान पेलले. हिंदवी स्वराज्य सर्व दक्षिणभर विस्ताराचे ध्येय महाराजांचे होते. त्यामुळे सर्वांना एकत्रित बरोबर घेऊन महाराजांनी ते शक्य करून दाखवले. अफजलखान वध, सुरतेची लूट, आग्राभेट, शाहिस्तेखानाच्या जनानखान्यात शिरून त्याच्यावर वार करणारा, पश्चिम किनाऱ्यावरील वैभवशाली मुघल शहर लुटून लाखो होनांची मालमत्ता लुटून नेणारा, बादशहाच्या भरदरबारात आपल्या अपमानाबद्दल संताप व्यक्त करणारा हा राजा आपल्या स्वजातीचा, स्वधर्माचा सौभाग्य तिलक आहे, असे अखंड हिंदुस्थानातील लोकांना वाटू लागले. स्वराज्याची स्थापना झाल्यानंतर इसवी सन १६७४ साली महाराजांनी रायगडावर राज्याभिषेक केला. हा क्षण सुवर्णाक्षरांनी कोरून ठेवावा असा होता. शिवकालामध्ये या कलियुगात पृथ्वीवरील क्षत्रिय नष्ट झाल्याने कोणी राजा होऊ शकत नाही, हा गैरसमज दूर करण्यासाठी महाराजांनी राज्याभिषेक केला व या अंधश्रद्धेला मूठमाती दिली. मराठी लष्कर उभारू शकतात. राज्य स्थापन करू शकतात, हे छत्रपतींनी दाखवून दिले. कोणाच्याही वर्चस्वाखाली छत्रपतींनी काम केले नाही. म्हणूनच छत्रपतींना आपण हिंदू समाजाच्या इतिहासातील एक नवे युग निर्माण करणारा युगपुरुष म्हणून ओळखतो. महाराजांनी स्वराज्यात मोठ्या लष्कराची निर्मिती केली. "उत्तरेकडील मुगल बादशहाच्या लष्करासारखे किंवा दक्षिणेतील आदिलशहाच्या लष्करसारखे महाराजांचे लक्ष सरंजामशाही लष्कर नव्हते. ते राष्ट्रीय स्वरूपाचे लष्कर होते."[2] महाराजांच्या लष्कराविषयी जयसिंगराव पवार यांनी व्यक्त केलेले मत अगदी तंतोतंत खरे ठरते. महाराज स्वतः या लष्करातील अधिकाऱ्यांची निवड करत होते. तळागाळातील सर्व जाती-धर्मातील लोक लष्करात होते. त्यामुळे ते एकनिष्ठ होते. एवढेच नव्हे तर लष्करामध्ये मुसलमान हेसुद्धा होते. महाराजांचे वैर मुस्लीम जाती किंवा

धर्माविरुद्ध नव्हते, तर त्यांचे वैर मुसलमान राज्यकर्त्यांविरुद्ध व त्यांच्या धार्मिक छळाविरुद्ध होते. म्हणून महाराजांच्या लष्करात मुसलमानांना स्थान होते.

'महाराजांनी फक्त राष्ट्रीय लष्कराची निर्मिती केली असे नाही तर त्या लष्करास स्वराज्य प्रेम, स्वदेश प्रेम, स्वातंत्र्य, भक्ती मातृभाव, आत्मविश्वास यासारख्या उच्च भावनांनी भारावून सोडले. आपण करत असलेल्या लक्षणीय मोहिमा केवळ लूट मिळविण्यासाठी अथवा प्रदेश जिंकण्यासाठी नसून स्वराज्य निर्मितीसाठी व परक्यांच्या प्रकारांचा अंमल नष्ट करण्यासाठी आहेत याची जाण प्रत्येक शिपायाच्या ठिकाणी महाराजांनी निर्माण केले होती. महाराजांचे हे कार्य लष्कराच्या कर्तृत्वाच्या दृष्टीने अधिक मोलाचे होते. कारण त्यामुळेच पराक्रमाच्या बरोबरीला स्वातंत्र्यप्रेमाची जोड मराठा देऊ शकले व पुढे औरंगजेबासारख्या रणधुरंदर सेनापतींशी अनेक वर्षे एकट्याने लढू शकले. महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी जो औरंगजेबाशी लढा दिला त्याची प्रेरणा महाराजांच्या या स्वातंत्र्यप्रेमाच्या शिकवणीत सापडते.'[९] जयसिंगराव पवार यांनी व्यक्त केलेले मत अगदी खरे ठरते. अनेक लष्करी मोहिमांचे महाराजांनी नेतृत्व केले. उंबरखिंडीची लढाई, वणी दिंडोरीची लढाई, कर्नाटकातील शेरखान लोदीची लढाई अशा अनेक लढायांत स्वतः महाराजांनी तलवार चालवली. महाराजांनी अनेक गनिमी काव्यांचा वापर केला. लष्करामध्ये महाराजांनी शिस्त निर्माण केली होती. स्वराज्यातील लोकांना रयतेला सैन्याने जराही त्रास देऊ नये, अशी सक्त ताकीद होती. स्त्रिया, बालके, ब्राह्मण, गरीब लोक यांना काहीच तोशीस देऊ नये, असा महाराजांचा आदेश होता. महाराजांनी दोन लाख सैन्य उभारले, आरमार बांधले, शंभराहून अधिक किल्ले बांधून घेतले. करोडो होनांचा खजिना जमविला. कोणाचेही पाठबळ नसताना महाराजांनी असे लष्कर उभारले, ही आश्चर्यचकित करणारी गोष्ट आहे.

महाराज एक कुशल प्रशासक होते. हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याचे महान कार्य त्यांनी केले व त्याबरोबर प्रशासनाची जोड त्याला दिली. फक्त स्वराज्य स्थापन करून किंवा प्रदेश जिंकून प्रशासक होता येत नाही तर जिंकलेला प्रदेश ताब्यात ठेवणे महत्त्वाचे असते. म्हणून महाराजांचे स्वराज्य वाढतच गेले. शिवपूर्वकालीन महसूलव्यवस्था महाराजांनी मोडीत काढली. रयतेवर जुलूम-जबरदस्ती करून महसूल वसूल करण्याची पद्धत महाराजांनी बंद केली. गावातील पाटील-देशमुख त्यांची वतने सरकारजमा केली. त्यामुळे सरकारी महसूल वाढला. सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार कमी झाला व प्रजेचा सरळ सरकारशी संबंध आल्याने आपुलकी, प्रेम वाढले. शेतकऱ्यांसोबत चांगले संबंध निर्माण झाले. हे राज्य मराठ्यांचे नसून आपले आहे अशी भावना लोकमानसात तयार झाली. महाराजांनी ज्याप्रमाणे जुनी वतने बंद केली, त्याप्रमाणे नवीन वतने कोणासही मिळणार नाहीत असा नियम केला. त्यामुळे सुरुवातीला स्वकीयांशीच त्यांना लढावे लागले. संघर्ष करावा लागला; पण त्यांच्याशी संघर्ष करत आपल्या स्वराज्यात त्यांना सामील करून घेतले. महाराजांनी स्वराज्यात राज्यकारभार करत असताना अधिकाऱ्यांच्या जागा वंशपरंपरेने भरल्या नाहीत तर गुणवत्ता पाहून व काम पाहून भरल्या. महाराज महत्त्वाच्या जागेवरील अधिकाऱ्याची निवड स्वतः करीत. गुणवत्ता हाच निकष राज्य कारभाराबाबत होता. सरसेनापती प्रतापराव गुजर लढाईत ठार झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या मुलाला राज्याचे सेनापतीपद दिले नाही, तर हंबीरराव मोहिते या शूरवीराला दिले. महाराजांची राज्यव्यवस्था राजेशाहीची असली तरी ती लोककल्याणकारी होती. लोककल्याण हा प्रशासनाचा केंद्रबिंदू होता. अष्टप्रधान मंडळाची निर्मिती महाराजांनी कुशल प्रशासनासाठी केली होती. प्रशासनातील प्रत्येक व्यक्तीने पारदर्शक काम करावे असा त्यांचा वचक होता. त्यामुळे स्वराज्यात कोणत्या अधिकाऱ्याने, कारकुनाने, सैनिकाने आपल्याच जनतेवर जुलूम केला नाही. जर कोणी केलाच, तर त्याला जबरी शिक्षा भोगावी लागे. म्हणून हे स्वराज्य रयतेला आपले वाटले. सुराज्य आणि स्वराज्य या दोन शब्दांना महाराजांनी एकत्रित केले. म्हणून महाराज केवळ कुशल प्रशासकच नाहीत, तर थोर मानवतावादी नेते होते, असेच म्हणावे लागेल. रा. ना. चव्हाण म्हणतात, "पुरुषोत्तम शिवरायांच्या राजकारणामागे शाश्वत तत्त्वज्ञान व डोळस विवेक होता. कार्यक्रम, नियोजन निश्चित होते. म्हणून सर्वांनी त्यांचे हात बळकट केले. शिवरायांना सत्तेसाठी सत्ता वापरता आली याचे कारण त्यांचे मन सुसंस्कारक्षम होते व आत्मा विशाल होता. महात्मा सत्तेवर आला म्हणजे स्वराज्याची निर्मिती होते; पण इतिहासात असे राजकीय संत दुर्मीळच होत. लोकशाहीसाठी सत्ता स्वीकारणारा, हा अष्टप्रधान योजना निर्माण करणारा उत्तम पुरुष म्हणून सतत आदर्श राहील."[१०] रा. ना. चव्हाणांनी शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाविषयी व्यक्त केलेले हे मत महत्त्वाचे

प्रजेचे कल्याण व हित जपणारा राजा, लोककल्याणकारी राजा हा राज्यातील धोरणावरून व त्याच्या अंमलबजावणीवरून ओळखला जातो. महाराजांचे राज्य देशमुख, देशपांडे व पाटील कुलकर्णी यांच्यासाठी नव्हते. ही मंडळी मुळातच श्रीमंत होती. त्यामुळे मदतीची खरी गरज होती ती सामान्य रयतेला, शेतकरी व दीनदलितांना, म्हणून प्रथम महाराजांनी या जनतेची काळजी घेतली. देशमुखांची वतने काढून घेतली. त्यांचे वाडे-गढ्या पाडल्या. शेतकऱ्यांना साऱ्यात माफी दिली. सरकारकडून बियाण्यांची व्यवस्था केली. त्याची काळजी महाराजांच्या अनेक पत्रांतून दिसून येते. सर्व जाती-धर्मातील लोकांना जवळ केले. स्वराज्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला. महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यामुळे लाखो मराठी माणसांना उपजीविकेचे साधन निर्माण झाले. जवळजवळ लष्करप्रमुख, आरमारप्रमुख, महसूलप्रमुख खात्यात मराठी माणसेच काम करत होती. सत्तेचा गैरवापर कधीच केला नाही. मोहिमांमध्ये गरिबांची घरे जाळली नाहीत. परराज्यातील मुलखातसुद्धा स्त्रिया व ब्राह्मणांचा आदर केला. गुन्हेगारांना कडक शिक्षा केली. चांगल्या नीतिमूल्यांचा पुरस्कार करून या मूल्यांना वर उचलून धरले. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेच्या प्रसंग सर्वपरिचित आहे. याची दखल मुस्लीम इतिहासकारांनीसुद्धा घेतली आहे. महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज जरी असले तरी मुसलमान अथवा ख्रिश्चन, जैन इत्यादी धर्मीयांना महाराजांच्या अमलाखाली पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होते. सर्व धर्मातील साधू संतांविषयी महाराजांना आदर होता. सर्व धर्म समान आहेत, सर्व धर्म चांगले आहेत हीच महाराजांची धर्मविषयीची भूमिका दिसून येते. म्हणून आपल्या स्वराज्यात प्रजेचे हित जपणारा कल्याणकारी राजा छत्रपती शिवाजी महाराज होते. असे हित जपणारा हा एकमेव राजा होता, असेच म्हणावे लागेल. महाराजांचे हे विचार कार्यकर्तृत्व आजच्या आणि राज्यकर्त्यांना दिशा देणारे, विचार करायला लावणारे आहे.

**समारोप/ निष्कर्ष -**

महाराजांचे कर्तृत्व असे बहुविध आहे. स्वराज्य संस्थापक लोककल्याणकारी प्रशासक अशी अनेक रूपे महाराजांच्या कर्तृत्वात दिसून येतात. महाराजांनी आपल्या समाजाला केवळ स्वराज दिले नाही, तर समाजात स्वाभिमान, अस्मिता जागी केली. एक नवे युग निर्माण करून गुलामगिरी नष्ट केली व त्याची जागा स्वातंत्र्यप्रेमाने घेतली. सर्वसामान्य माणसात आत्मविश्वास निर्माण करून स्वराज्यप्रेम व स्वराज्यासाठी प्राण अर्पण करणारी जिद्द निर्माण केली. इथल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात स्वराज्यप्रेम निर्माण करणे हे महान कार्य महाराजांनी केले. त्यांनी उभारलेले आरमार, लष्कर, जिंकलेले किल्ले, केलेल्या मोहिमा या महत्वाच्या बाबी आहेतच; पण महाराजांच्या मृत्यूनंतर आठ ते दहा वर्षांत मुसलमान सैनिकांनी स्वराज्यात धुमाकूळ घातला. इथल्या जनतेला त्रासून सोडले; पण इथल्या जनतेत महाराजांनी जे स्वराज्यप्रेम निर्माण केले होते ते कधीही कमी झाले नाही, यात खरे महाराजांचे कर्तृत्व आहे. यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर घराघरांत संताजी, धनाजी निर्माण झाले. लष्कराची जुळवाजुळव पुन्हा झाली मराठी माणसांनी लष्कर उभे केले आणि पुन्हा मराठी साम्राज्याचे डोके वर आले. मराठ्यांचे स्वराज्य नष्ट होऊ शकले नाही, याचे कारण शिवाजी महाराजांच्या युगनिर्मितीच्या कार्यात व कामगिरीत आहे. महाराजांच्या मृत्यूनंतर सव्वीस वर्षे मराठ्यांनी लढा दिला; कारण महाराजांची प्रेरणा त्यामागे होती. कर्तृत्व त्यामागे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा गौरव करताना समर्थ रामदासांनीही स्वधर्माचे रक्षण करणारा जगात कोणी नाही असे म्हटले.

"यशवंत किर्तीवंत ! वरदवंत सामर्थ्यवंत !
पुण्यवंत नीतीवंत ! जाणता राजा !
या भूमंडळाचे ठायी ! धर्मरक्षी ऐसा नाही !
महाराष्ट्र धर्म राहिला काही ! तुम्हा कारणे !

**संदर्भ-**


१. पवार जयसिंगराव, 'छत्रपती शिवाजी महाराज', अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, १९८१, पृष्ठ क्र. २६२
२. पवार जयसिंगराव, 'छत्रपती शिवाजी महाराज', अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, १९८१, पृष्ठ क्र. २७३
३. पवार जयसिंगराव, 'छत्रपती शिवाजी महाराज', अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, १९८१, पृष्ठ क्र. २७३
४. चव्हाण ए. ना., 'शककर्ते श्री राजा शिवछत्रपती', जयकुमार ऑफसेट, पुणे, २००७, पृष्ठ क्र. १५
५. मेहेंदळे गजानन, 'राजा शिवछत्रपती', डायमंड पब्लिकेशन, पुणे, १९८७


◆◆◆◆◆